पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे

# शेतकरी संघटक

वर्ष ११ वे

अंक १९ वा

२१ मार्च १९९५

# महात्माजींचा पराभव

## – शरद जोशी

माझं सुदैव म्हणा की दुर्दैव, आयुष्यात मला कोण्या महात्म्याचं दर्शन झालं नाही. गांधीजी गेले तेव्हा मी लहान होतो, विद्यार्थी होतो त्यामुळे त्यांच्या दर्शनाचा योग आला नाही. मोठा झाल्यानंतर मी माझ्या कामाला लागलो. दरम्यान, काही महात्मे समोर येऊन गेलेही असतील पण त्यांचं महात्म्य मला जाणवलं नसावं म्हणून मला दुर्दैवी म्हणा. नंतर कदाचित लक्षात येईल की अमुक एक व्यक्ती भेटली होती आणि ती महात्मा होती. पण आजपर्यंत असं जाणवलं नाही.

याला एक अपवाद आहे. त्यांची भेट झाली होती म्हणणं कठीण आहे, पण रविशंकर महाराजांचं जेव्हा दर्शन झालं तेव्हा ते त्यांच्या अखेरच्या आजारपणात होते. बिपीनभाई मला त्यांच्यासमोर घेऊन गेले. रविशंकर महाराजांना बोलताना कष्ट होत होते, ऐकू येण्यातही अडचण होती, पण त्यांची बुद्धी स्वच्छपणे काम करीत होती. बिपीनभाईंनी जेव्हा माझं नाव सांगितलं तेव्हा माझं नाव शेतकरी आंदोलनाशी जोडलेलं आहे याची त्यांना माहिती असल्याचे जाणवले. हे एक उदाहरण सोडलं तर महात्म्यांचं दर्शन होण्याचं भाग्य – सौभाग्य किंवा दुर्भाग्य – मला लाभलेलं नाही.

सौभाग्य शब्द मी यासाठी वापरतो की सर्वसाधारण माणसाच्या जीवनावर महात्म्यांच्या संपर्काचा परिणाम काय होत असावा हे सांगणं कठीण आहे; पण अनेक महात्म्यांच्या परिवारांची मती व गती कुंठित झालेलीच पाहायला मिळते.

महाकवि कालिदासांनी रघुवंशाच्या 'इंदुमति स्वयंवर' या अध्यायात उपमालंकाराचा अत्यंत सुरेख आविष्कार दाखविला आहे. राजकन्या इंदुमतीच्या स्वयंवरासाठी बरेच राजपुत्र मंडपात बसले होते. इंदुमतिला घेऊन सुनंदा एका एका राजकुमाराचा परिचय करून देत पुढे पुढे जात होती. जसजशी इदुमति एखाद्या राजकुमारसमीप येऊ लागे तसतशी त्या राजकुमाराच्या मनात आशा जागी होत असे की ही मलाच माळ घालील आणि त्याचा चेहरा उजळून जात असे, पण त्याला वगळून ती पुढे जाऊ लागताच त्याचा चेहरा काळवंडून जात असे.

आपल्याही समोर आपल्या आयुष्यभरात काही 'महात्मे' येऊन जात असतील, आपण त्यांचे महात्म्य ओळखू म्हणून त्यांचे चेहरे उजळत असतील आणि आपल्यला त्यांच्यात महात्म्य जाणवले नाही म्हणून चेहरा पाडून जात असतील. आपली निराशा होते, त्यांचीही निराशा होत असेल!

महात्मा म्हणजे अंधारामध्ये प्रकाश देणारा दिवा किंवा उन्हामध्ये छाया देणारा वृक्ष होय असे धरले तरी तो जो काही प्रकाश किंवा ती जी काही छाया असेल त्याचा फायदा घेणे, न घेणे सर्वस्वी आपल्यावरच अवलंबून असते.

सूर्य आपला प्रकाश सर्व ठिकाणी सारखाच देतो. सूर्याचे प्रकाशकिरण मातीवर पडले तर ते परावर्तित होत नाहीत. पण तेच किरण जर एखाद्या रत्नावर किंवा हिऱ्यावर पडले तर त्यावरून त्यांचं परावर्तन होतं आणि रत्न किंवा हिरा मोठा विलोभनीय दिसतो.

घनदाट सावलीचा वृक्ष रणरणत्या उन्हात चालणाऱ्या वाटसरूसाठी काही काळासाठी विश्रांतीस्थान होऊ शकतो.

**दिनांक २७ फेब्रुवारी १९९५ रोजी सेवाग्राम येथे सूरत येथील 'मैत्री ट्रस्ट'चा वर्धापन दिन साजरा झाला. गुजरातचे गांधी पं. रविशंकर महाराजांच्या ११२ व्या जन्मदिनी साजरा झालेल्या या कार्यक्रमात शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांनी हिंदीमध्ये केलेल्या भाषणात केलेल्या प्रकट चिंतनाचे हे मराठी शब्दांकन.**

**बिपीनभाई व गुणवंतभाई देसाई या दोन बालमित्रांनी आपल्या स्वतःच्या मिळकतीतून उभ्या केलेल्या 'मैत्री' या विश्वस्त निधीतून अनेक समाजसेवकांना व संस्थांना सहयोग निधी अर्पण करण्यात आला. शेतकरी चळवळीचे कार्यासाठी विश्वस्त निधीतर्फे रुपये एक लाखाचा धनादेश श्री. शरद जोशी यांच्या हाती देण्यात आला. किसान समन्वय समितीचे अध्यक्ष श्री. बिपीनभाई देसाई यांनी हा निधी देशभरच्या शेतकरी चळवळीसाठी उपयोगात आणावा म्हणून हा धनादेश शरद जोशींनी त्यांना सुपूर्द केला.**

**या कार्यक्रमाला गुजरात व महाराष्ट्रातील सुमारे पाचशे कार्यकर्ते तसेच गांधीपरिवारातीलही प्रमुख कार्यकर्ते हजर होते.**

विश्रांती घेतल्यानंतर पुन्हा नव्या जोमाने आपली वाटचाल तो वाटसरू पुढे चालू करणार असेल तर विश्रांतीचा काही उपयोग झाला असे म्हणता येईल. पण, जर का वाटसरू त्या सावलीच्या मोहात पडून तिथेच थांबून राहिला तर तो वृक्ष त्या वाटसरूच्या उपयोगी पडला असं म्हणणं कठीण आहे.

अंधारात एक प्रकाश किरण चमकला, पुढे पाऊल कसे टाकायचे याचे दर्शन झाले की त्या प्रकाशकिरणाच्या टप्याबाहेरील अंधारातही एखादं पाऊल टाकण्याची हिम्मत आली तर त्या प्रकाश-किरणाच्या जनक दीपाने काही काम केले असे म्हणता येईल. पण त्या दिव्यावरच जीव जडून तेथेच बसून राहिले तर दिव्याचा आपल्याला काही उपयोग झाला असं म्हणणं कठीण आहे.

मला असं वाटतं की बऱ्याच महात्म्यांच्या बाबतीत दुर्दैवाची गोष्ट ही घडली आहे की त्यांच्या सावलीमध्ये ज्यांचं लालनपालन व्हायला हवं होतं, त्यामध्ये जे मोठे व्हायला हवे होते आणि मोठे होऊन त्या सावलीतून बाहेर पडून पुढच्या पिढीसाठी ज्यांनी सावल्यांच्या जागा तयार करण्याची हिम्मत करायला हवी होती ते बहुतांशी त्या महात्म्यांच्याच सावलीत विश्रांती घेत बसले आणि कायम विश्रांतीच घेत बसले. सावलीतून बाहेर पडण्याची त्यांनी हिम्मत दाखविली नाही.

मी आजवर अनेक वेळा म्हटले आहे की महात्म्यांचं खरं दुर्भाग्य हे की त्यांचा पराभव जगाने नाही केला, त्यांचा पराभव त्यांच्याच शिष्यांनी केला. त्यांचे शिष्य त्यांना पूर्णांशाने समजू शकले नाहीत आणि त्यांच्या समजुतीमध्ये ज्या गोष्टी बसल्या त्याच ते कर्मकांडाप्रमाणे करत बसले. जयंत्या-पुण्यतिथ्या करणे ठीक आहे, त्यांनाही काही महत्त्व असते. पण त्यातच अडकून राहाणे आणि महात्म्याला सापडलेला सत्यकण डावलून फक्त त्याची व्यक्तिपूजा करत राहाणे यातच महात्म्यांच्या पराभवाची सुरुवात होते.

माझं हे विवेचन बऱ्याच जणांना मान्य होणं अवघड आहे. मी स्वतःला, गांधीजींना सापडलेला सत्यकण जोपासणारा मानतो. पण, त्याचबरोबर मी सातत्याने मांडत आलो आहे की कोणा एका व्यक्तीला प्रमाण मानणे आणि असे म्हणणे की कोणत्याही समस्येची उकल कोण्या एका व्यक्तीच्या विचारधारेमध्ये किंवा कोण्या एका ग्रंथामध्ये मिळू शकते हे चूक आहे. असं जर कुणी मनापासून मानत असेल तर त्याचा अर्थ इतकाच की त्या व्यक्तीसमोर खरे प्रश्न अजून आलेच नाहीत. भगवान कृष्ण असो, पुरुषोत्तम राम असो की महात्मा गांधी असोत, कितीही मोठा महात्मा असला तरी तो सांत (Finite) रूप घेऊनच जन्मला होता, कोणीही अनंत (infinite) रूपाने जन्मला नव्हता ही बाब जोवर खरी आहे तोपर्यंत सांत महात्म्यांचे दर्शन – विचारप्रणाली अनंत काळपर्यंत चालणारी आहे असं जर कुणी म्हणायला लागलं तर त्याचा अर्थ इतकाच की असं म्हणणारानं अजून विचार करायला सुरुवातच केलेली नाही.

याचप्रमाणे, जे लोक धर्माच्या अभिमानाच्या गोष्टी बोलतात त्यांच्या बाबतीतही हेच आहे. मी त्या धर्माभिमान्यांना मानायला, त्यांच्याबद्दल आदर बाळगायला तयार आहे की ज्या धर्माचा ते सन्मान करतात, अभिमान बाळगतात, गर्व करतात तो धर्म त्यांना जन्माच्या अपघाताने मिळालेला नाही. ज्या धर्मात जन्मला त्याचा अभिमान बाळगताना त्या धर्माचा विचारपूर्वक अभ्यास केला असण्याची शक्यता नसेल असे नाही पण असा अभ्यास केल्याचे सिद्ध करून दाखवावे लागेल. जो धर्म जन्माच्या अपघाताने मिळालेला नाही त्याबद्दल एखादी व्यक्ती अभिमान बाळगत असेल तर तिने त्या धर्माचा विचारपूर्वक अभ्यास केला आहे असं समजायला हरकत नाही.

गांधीजींच्या एका परमभक्ताबरोबर चर्चा चालली होती. ते म्हणाले की, "आम्ही गांधीजींना एक प्रकारे 'संपूर्ण महात्मा' मानतो." मी जेव्हा म्हटले की, "मला हे सैद्धांतिकदृष्ट्या अशक्य वाटते." तेव्हा ते म्हणाले की, "आम्ही सर्व तऱ्हेने विचारविमर्श करून या निर्णयाप्रत आलो आहोत की गांधीजी 'संपूर्ण महात्मा' होते." मला वाटतं अशी माणसं 'Doesn't know that he doesn't know' (म्हणजे 'त्याला समजत नाही की त्याला समजत नाही') या प्रकारात बसतात.

मी आग्रहपूर्वक मानतो की गांधीजींना सापडलेला सत्यकण जोपासून पुढे नेणारा मी आहे. आणि यातच गांधीजींबद्दलचा माझ्या मनातला परम आदर मी व्यक्त केला आहे. परमेश्वराची कल्पना पिता म्हणून केली तर कोणाही पित्याला आपला मुलगा सकाळ दुपार संध्याकाळ, सर्व काळ आपल्या पायाला हात लावून सतत आपली पूजा करीत रहावा असं वाटणार नाही. अशा पूजेने चांगला पिता खूष होईल असं मला वाटत नाही. त्याचप्रमाणे, महात्म्यांच्या बाबतीतही त्यांची सकाळ, संध्याकाळ पूजा करणे, त्यांनी सांगितलेला शब्द न् शब्द बरोबरच आहे, त्यात चुकीचं काही नाही, त्यांनी सांगितल्याच्या पलिकडे विचार काही नाही असं मानणं म्हणजे त्या महात्म्यांशी केलेला द्रोहच आहे.

महात्म्यांसंबंधी या विवेचनात विशेषकरून मी महात्मा गांधीजींच्या संदर्भात भर देणार आहे. कारण महात्माजींचा अभ्यास गांधीभक्तांप्रमाणे मीही केला आहे. गांधीजींचं जे काही साहित्य माझ्या वाचनात आलं आहे त्यावरून मी ठामपणे म्हणू इच्छितो की 'गांधीजींइतका गतिमान (Dynamic) दर्शन देणारा महात्मा सापडणे विरळाच.'

सेवाग्रामला मी बऱ्याचदा येतो, येत राहाणार आहे; यावसं वाटतं. पण, इथे आल्यानंतर एका गोष्टीचं दुःख होतं. खरं तर सेवाग्राम हे एक स्फूर्तिस्थान आहे. इथे माझ्यासारखे, जे गांधीपरिवारातील म्हटले जात नाहीत, आले म्हणजे त्यांच्याही मनामध्ये काही ना काही प्रेरणा उचंबळून येतात; पण एक प्रश्नही उभा राहतो. गेल्या सत्तेचाळीस वर्षांमध्ये, गांधीजींच्या निर्वाणानंतर गांधीपरिवाराने आपली जबाबदारी पार पाडली आहे काय? मला वाटतं कोणीतरी या प्रश्नाचं उत्तर शोधून काढलं पाहिजे.

गेले दोन महिने महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांत मी निवडणुकीच्या प्रचारसभांतून भाषणे करीत फिरतो आहे.

प्रत्येक भाषणात काही प्रश्न पुढे ठेवले. त्या प्रश्नांवर विचारविमर्श होणे आवश्यक आहे.

पहिला प्रश्न. गांधीजींची इच्छा सव्वाशे वर्षे जगण्याची होती. आज गांधीजी असते तर ते सव्वाशे वर्षे वयाचे असते. आज जर ते असते तर त्यांनी फक्त पंचा वापरण्याऐवजी अंगभर कपडे वापरायला सुरुवात केली असती का? ते म्हणाले असते का की आता देशातील सर्व लोकांना पुरेसे कपडे वापरायला मिळू लागले आहेत, आता मला इतके कमी कपडे वापरण्याची जरूरी नाही?

दुसरा प्रश्न. आज गांधीजी असते तर सेवाग्राममध्येच असते का साबरमतीला परत गेले असते? ते म्हणाले असते का की साबरमती आश्रमातून दांडी यात्रेला निघताना मी प्रतिज्ञा केली होती की देशाला संपूर्ण स्वराज्य मिळेपर्यंत मी या आश्रमात परत येणार नाही; आता देशाला पूर्ण स्वराज्य मिळाले आहे तेव्हा मला साबरमतीला परतायला हरकत नाही?

तिसरा प्रश्न. ज्या स्वातंत्र्यसैनिकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आत्मबलिदान केले, हौतात्म्य पत्करले त्यांच्या आत्म्याला देशाची आजची परिस्थिती पाहून सुख लाभत असेल का?

महाराष्ट्र आणि गुजरातमधील प्रचारसभांत हे तीन प्रश्न विचारून लोकांकडून त्यांची उत्तरे मागत आलो.

भले, मनमोहनसिंग म्हणोत की आम्ही प्रगती केली आहे किंवा पी. व्ही. नरसिंह राव म्हणोत की आम्ही देशाचा विकास केला आहे; पण मला कोणत्याही सभेत लोकांच्या चेहऱ्यावर या प्रश्नांची होकारार्थी उत्तरे दिसली नाहीत.

अजून एक प्रश्न मी, विशेषतः गुजरातमध्ये विचारला.

आज निवडणुकीमध्ये आपल्यासमोर तीन प्रमुख पक्ष आहेत. एक पक्ष आहे, भाजपा जो विश्व हिंदु परिषदेशी संबंधित आहे, राष्ट्रीय सेवक संघाशी संबंधित आहे. गांधीजींच्या देहाच्या हत्येची जबाबदारी ज्यांच्यावर टाकली जाते अशा लोकांशी हा पक्ष संबंधित आहे. त्यांच्यातील काही वक्ते आजसुद्धा गांधीजींना शिव्या देतात.

दुसरा पक्ष आहे काँग्रेस. मी गेली १५ वर्षे सातत्याने मांडत आलो आहे की गांधीजींच्या हत्येनंतर नेहरूंनी देशाचा कारभार एखाद्या सिनेमातील श्रीमंताच्या दिवाणजीने मालकाच्या मृत्यूनंतर केलेल्या कारभाराप्रमाणेच केला. मरणाच्या घटका मोजणाऱ्या श्रीमंताने दिवाणजीच्या हाती विश्वासाने तिजोरीच्या किल्ल्या सोपवून म्हणावे की माझी मुलं लहान आहेत, अजाण आहेत, त्यांची काळजी घे; पण दिवाणजीने मात्र सर्व मालमत्तेवर डल्ला मारून मालकाच्या मुलांना देशोधडीला लावावे. गांधीजींच्या आर्थिक विचारसरणीची हत्या पंडित नेहरूंनी केली. त्या नेहरूंचा काँग्रेस पक्ष सत्तेचाळीस वर्षे या देशावर राज्य करीत आहे. 'समाजवाद' शब्दाची भूल पडल्यामुळे कदाचित्, सर्वसामान्यांच्या ही गोष्ट लक्षात आली नसेल, पण जेव्हा नेहरू गांधीजींचा विचार फेकून देऊन देशाला चुकीच्या दिशेने घेऊन जात होते – ज्यामुळे देशाचे फार मोठे नुकसान झाले, देश बुडाला आणि आज साऱ्या देशाला कळून चुकलं आहे की ती चुकीची दिशा होती – तेव्हा ती दिशा चुकीची आहे हे देशाला सांगण्याची जबाबदारी स्वतःला गांधीपरिवारातील म्हणविणारांची होती. गांधीपरिवाराने गेल्या सत्तेचाळीस वर्षात आपली ही जबाबदारी पार पाडली आहे का? का ते सुद्धा शासनाकडून मिळणाऱ्या सोयीसवलतीतच गुंतून पडले? नेहरू राजवटीने देशाची, देशातील सर्वसामान्य जनतेची जी लूट केली त्यात अन्यार्थाने गांधीपरिवाराचाही काही हात नव्हता ना?

तिसरा पक्ष आहे कांशीरामजींचा बहुजन समाज पार्टी. ते लोक तर आजही गांधीजींना खुलेआम शिव्या देत आहेत. त्यांना म्हटलं की यात सभ्यपणा नाही, शिष्टाचार नाही तर तेही ते मानायला तयार नाहीत. गांधीजींच्या 'हरिजन' शब्दाचीही ते कुचेष्टा करतात. या पक्षाच्या लोकांनी गांधीजींच्या समाजशास्त्राची हत्या केली आहे.

देश स्वतंत्र झाल्यानंतर सत्तेचाळीस वर्षांनी आज लोकांसमोर तीन पक्ष आहेत – एक गांधीजींच्या देहाचा हत्येशी संबंधित, दुसरा त्यांच्या अर्थविचाराच्या हत्येशी संबंधित आणि तिसरा त्यांच्या समाजशास्त्राच्या हत्येशी संबंधित. गांधीजींच्या या सेवाग्रामच्या आश्रमामध्ये वृक्ष वाढत आहेत, रोपे वाढत आहेत; इथे सावलीही भरपूर आहे; इथे आल्यानंतर इतिहासाच्या आठवर्णींना उजाळा मिळतो. पण गांधी विचाराचा जो आत्मा आहे तो पुढे नेणारं आंदोलन काही या आश्रमातून पुढे आले नाही. मग गेल्या सत्तेचाळीस वर्षांत गांधी या महात्म्याच्या या तिहेरी हत्येला या महात्म्याच्या सावलीत विश्रांती घेणारा गांधीपरिवारही जबाबदार नाही काय?

गांधीपरिवाराने सेवाग्राममधून गांधीजींचा कार्यक्रम पुढे आणण्याचे आंदोलन उभे केले नाही कारण ते गांधीजींच्या सावलीत अडकून पडले, त्यांची केवळ पूजाअर्चा करीत राहिले. गांधीजींनी निर्माण केलेल्या सावलीत काही काळ विसावून पुढच्या मार्गक्रमणेस सुरुवात करण्याऐवजी ते या मठात तळ ठोकून बसले. आणि माझं स्पष्ट मत आहे की एका मठातून दोन महात्मे कधीच निर्माण होऊ शकत नाहीत. एका मठातून एकच महात्मा बनतो, त्यातील बाकी सर्वजण त्या मठाच्या सावलीतच अडकून बसतात, त्यांच्याकडून दुसरी क्रांती घडल्याचे ऐकिवात नाही.

मला असं वाटतं आहे की मोठा बदल, केवळ देशातच नव्हे तर साऱ्या जगात घडू लागला आहे. आजपर्यंत एखाद्या व्यक्तीचे किंवा समाजव्यवस्थेचे मोठेपण ती व्यक्ती किंवा व्यवस्था दुसऱ्यांसाठी किती काम करते आहे, 'दुःखतप्तानाम् प्राणिनाम् आर्तिनाशनम्' साठी ती किती काम करते आहे यावर ठरत असे. पण, दुसऱ्यांसाठी जगणाऱ्यांनी शेवटी काय साध्य केले हे तपासायला गेलो तर लक्षात येते की जाहिररित्या स्वार्थ साधणाऱ्या लोकांनी जगाचं फारच कमी नुकसान केलं आहे; उलट, परमार्थाच्या गोष्टी करणारांनी जगाचं फार मोठं नुकसान केलं आहे. एकूण परिस्थितीवर प्रामाणिकपणे चिंतन करावयाचे असेल तर या प्रश्नाचं उत्तर शोधलं पाहिजे की स्वार्थ आणि परमार्थ यापैकी कोणत्या प्रवृत्तीने जगाचे जास्त नुकसान केले.

जेथे जेथे संपत्ती गोळा होते, जेथे जेथे सत्ता असते तेथे भ्रष्टाचार येतो. आणि समाजात सत्ताकेंद्र असल्याशिवाय चालत नाही. समाजवादाने मांडणी केली की समाजातील प्रत्येक व्यक्ती आपापल्या क्षमतेनुसार समाजाला काही देत राहाते आणि आपापल्या आवश्यकतेइतकंच समाजकडून घेत राहाते असं झालं तरच माणूस 'समाजवादी व्यक्ती' बनेल आणि त्यातून भ्रष्टाचाराचं प्रश्न मिटून जाईल. कितीतरी वर्षे निघून गेली, मार्क्सचाही पाडाव झाला पण अशी 'समाजवादी व्यक्ती' काही तयार झाली नाही. मोठमोठ्या संस्थांमध्ये महात्मा गांधींच्या कल्पनेनुसार 'विश्वस्त' भावनेने काम करणारी माणसेही सापडणे दुर्मिळ, असतीलच तर ती नियम सिद्ध करायला लागणाऱ्या अपवादाइतकीच सापडतील. समाजवादाची मांडणी होऊन शंभर वर्षे होऊन गेली पण अशी उन्नत 'समाजवादी व्यक्ती' तयार होऊ शकली नाही. तेव्हा आता समाजाला समजून चुकले आहे की असा कुणी उन्नत महात्मा वरून येणार नाही जो आपल्याला आर्थिक उन्नतीचा मार्ग दाखवील. आर्थिक उन्नतीसाठी आजवर अनेक महात्म्यांनी परमार्थाचा, समाजकल्याणाचा मार्ग सांगितला, पण त्या मार्गाने सर्वसामान्यांची काही आर्थिक उन्नती झालेली दिसत नाही; उलट, समाज आर्थिकदृष्ट्या अधिकाधिक खोल गर्तेत चाललेला दिसत आहे.

आता हे सिद्ध झाले आहे की कुठे मॉस्कोमध्ये बसून किंवा दिल्लीमध्ये बसून कोणी किती धान्य पिकवावे, कोणी किती उत्पादन करावे हे ठरवून समाजची प्रगती होऊ शकत नाही. लोकांना हेही समजते आहे की याला चांगली पर्यायी व्यवस्था समोर दिसत नाही. आज नाही, उद्यापरवाही असेल किंवा कसे सांगता येत नाही. पण, त्यांना एक गोष्टी निश्चित समजते की माणसाला आपापल्या कुवतीनुसार एका विशिष्ट व्याप्तीच्या क्षेत्राची जाण होण्याची नैसर्गिक देणगी मिळालेली आहे. ज्यांनी आपल्याला त्या पलिकडचेही दिसते असे आजवर म्हटले त्यांचा दांभिकपणा समाजाच्या खालावत जाणाऱ्या परिस्थितीने उघड केला आहे.

आपापल्या दृष्टीने आकलन करून आपले सुखसमाधान, आपल्या परिवाराचे सुखसमाधान वृद्धिंगत करण्याचे प्रयत्न करणारे लोक, दूरदृष्टी ठेवून निश्चित स्वार्थाचा विचार करणारे लोक, तो स्वार्थ साधतांना एकमेकांबरोबर स्पर्धा करणारे, एकमेकांशी झगडणारे, प्रयत्न करीत असतांना चुका करणारे, धडपडणारे लोकच पुढे उभे राहू लागले आहेत. जगामध्ये जर काही विकास झाला असेल तर तो केवळ, स्वार्थाने प्रेरित होऊन एकमेकांशी स्पर्धा करीत पुढे चालण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्वसामान्यांमुळे झालेला आहे; महात्म्यांच्या आधाराशिवाय झाला आहे. हे दर्शन पुढे येणार असेल तर आपल्या सर्वांवर जबाबदारी येऊन पडते की या विषयावर प्रकाश पाडला पाहिजे. समाजात मोठा बदल घडत आहे. दुसऱ्यांसाठी जगणारांचा नाही, तर स्वतःवर निष्ठा ठेवणाऱ्या व्यक्तींचा जमाना येत आहे. व्यक्तीचा विकास म्हणजेच समाजाचा विकास हा सिद्धांत पुढे येत आहे आणि या सिद्धांताच्या सिद्धतेसाठी कोण्या महात्म्याच्या दलालांची आवश्यकता नाही.

**स्वतंत्र भारत पक्षाला मतदारांनी का नाकारले?**
**आपले मत थोडक्यात कळवा.**
संपादक, शेतकरी संघटक
अंगारमळा, आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे.

# पंजाब हरियानाच्या किसानांनी दिल्लीमध्ये गहू जाळून निषेध नोंदविला

एकीकडे खुल्या व्यस्थेचा पुकारा करीत असताना किमान भावाच्या धोरणाने शेतकऱ्यांच्या लुटीची व्यवस्था चालूच ठेवणे, शेतीमालाच्या निर्यातीवर बंधने घालणे, सेवेमध्ये काहीही सुधारणा न करता विजेच्या दरामध्ये भरमसाठ वाढ करणे या मार्गांनी शेतकरीविरोधी धोरण राबविणाऱ्या शासनाचा निषेध करण्यासाठी पंजाब व हरियाणामधील शेतकऱ्यांनी भारतीय किसान यूनियनच्या नेतृत्वाखाली १५ मार्च १९९५ रोजी नवी दिल्ली येथील लाल किल्ल्याच्या पिछाडीस 'निषेध मेळावा' भरवून आपल्याबरोबर आणलेल्या मूठमूठ गव्हाची रास करून त्याची होळी केली. या मेळाव्यास दोन्ही राज्यांतून पंधरा हजारावर शेतकरी स्त्रीपुरुष आले होते. मेळाव्यात भारतीय किसान यूनियनचे अध्यक्ष सरदार भूपेंद्रसिंग मान, महासचीव बलबीर सिंग राजेवाल, पंजाबचे अध्यक्ष सरदार बलदेव सिंग मियाँपूर, हरियानाचे अध्यक्ष श्री. केहरी सिंग, सचीव प्रेमसिंह दहिया, उ. प्र. चे अध्यक्ष हरपाल सिंह ॲडव्होकेट तसेच किसान समन्वय समितीचे अध्यक्ष श्री. बिपीनभाई देसाई व अन्य कार्यकर्त्यांनी मार्गदर्शन केले.

संपूर्ण भारतातील शेतकऱ्यांना त्यांच्या १७ प्रमुख पिकांतून दरवर्षी २४००० कोटी रुपयांना लुटणाऱ्या शासनाने

★ पंजाबच्या गहू उत्पादकाची किंमत गेल्या वर्षीपेक्षा क्विंटलमागे फक्त १० रुपयांनी वाढवली;
★ अकार्यक्षमता व भ्रष्टाचाराने परिपूर्ण वीज बोर्डाच्या सेवांमध्ये काहीही सुधारणा न करता वीज दरात प्रचंड वाढ केली.
★ भाताचा किमान आधार भाव ३८० रु. प्रती क्विटल जाहीर केलेला असूनही सरकारने हरियानातील शेतकऱ्यांना क्विंटलला फक्त ३६० रुपयेच दिले.
★ गव्हाच्या निर्यातीवरच नव्हे तर देशांतर्गत वाहतुकीवरही अनेक निर्बंध चालूच ठेवले आहेत.

सरकारने आपली ही शेतकरीविरोधी धोरणे त्वरीत बंद न केल्यास, अपरिहार्यपणे, उग्र आंदोलन उभे करावे लागेल असा इशारा या मेळाव्यात देण्यात आला.

●

# ‘इसापनीती’तील काही कथा

## दुबळे बोल

एकदा पशूंच्या जाहीर सभेत सशांनी मोठी भाषणे केली. सर्वांना सारखी वाटणी मिळाली पाहिजे म्हणून सांगितले. पण ते ऐकून सिंह म्हणाले, “गरीब प्राण्यांनो, तुमची भाषणे चांगली झाली. पण त्याचा पाठपुरावा करण्याकरिता आम्हाला आहेत तशी नखं आणि दात तुम्हाला पाहिजे होते.”

## निर्बुद्ध आनंद

एकदा उन्हाळ्यात सूर्याच्या लग्नानिमित्त सर्व प्राणी मजा करीत होते त्यांत बेडूकही सामील होऊन आनंदाने नाचत होते; पण ते पाहून एक बेडूक म्हणाला, “मूर्खांनो, हा सगळा आनंद कशाकरितां? एक सूर्य आहे तर सगळी डबकी उन्हाळ्यात कोरडी पडतात. उद्या याचं लग्न होऊन त्याला त्याच्यासारखाच मुलगा झाला तर आपले हाल मग बघायलाच नको.”

* पुष्कळसे निर्बुद्ध लोक वाईट ठरणाऱ्या गोष्टीबद्दलही आनंदाने नाचतात.

## राजकारणाची रीत

वास्तविक साप आणि रानमांजर हे दोघेहि उंदराचे शत्रु! पण एकदा त्या दोघांतच भांडण जुंपले. जेव्हा उंदरांनी ते पाहिले तेव्हा ते धीटपणे आपल्या बिळांतून बाहेर आले आणि ते भांडण पाहू लागले. पण उंदरांना पाहताच ते दोघेही आपसातले भांडण विसरले आणि आपल्या नेहमीच्या भक्ष्यावर जोडीने तुटून पडले.

* राजकारणातही असेच आहे. दोन विरुद्ध पक्षांची मारामारी चालते त्यात जर कोणी पडले तर त्या बाहेरच्या माणसांचा नाश करण्याकरिता दोन्ही पक्ष एक होतात.

## स्वतःचे संरक्षण प्रथम

एका पारध्याने जाळे लावले आणि आपल्या जवळची माणसाळलेली काही कबुतरे त्याच्यावर लटकावून ठेवली. नंतर दूर बसून तो वाट पाहात राहिला. थोड्याच वेळात काही रानटी कबुतरे तेथे आली आणि त्या जाळ्यांत सापडली. पारधी येऊन त्यांना उचलून घेऊ लागला तेव्हा ती त्या माणसाळलेल्या कबुतरांना दोष देऊ लागली. ती म्हणाली, “तुम्हाला जर हे जाळे आहे असे माहित होते तर तुम्ही आम्हाला आधीच सावध का नाही केलंत?”

“काय करणार!” ती माणसाळलेली कबुतरे म्हणाली, “तुम्ही आम्ही जातभाई आहोत हे खरे! पण तुमच्या रागापेक्षा आमच्या मालकाच्या रागाची पर्वा आम्हाला अधिक करावी लागते.

* याचप्रमाणे गुलामगिरीत राहणाऱ्या गुलामांनी धन्याची मर्जी सांभाळण्याच्या धास्तीत स्वबांधवांची पर्वा ठेवली नाही, तर त्या गुलामांना दोष देण्यात अर्थ नाही.

## धनी बदलला तरी नशीब तेच

देशातले सरकार बदलले तरी गरीब बिचाऱ्या प्रजेला एका मालकाच्या ऐवजी दुसरा मालक आला असेच सामान्यपणे वाटते. हेच सत्य खालील गोष्टीत सांगितले आहे.

एका घाबरट म्हाताऱ्या मनुष्याने आपल्या गाढवाला एका कुरणात चरायला सोडला होता. एकाएकी त्याच्या कानांवर शत्रूच्या सैनिकांचा आवाज आल्यामुळे तो सावध झाला आणि आपल्या गाढवाला म्हणाला, “चल पळ पळ लवकर! नाहीतर आपण त्याच्या हातात सापडू.”

पण गाढवाने जराही घाई केली नाही. तो म्हणाला, “मला सांगा, मी जर शत्रूच्या हातात सापडलो तर ते माझं काय करतील? माझ्या पाठीवर ते दुप्पट ओझं लादतील असं वाटतं तुम्हाला?”

“नाही बुवा तसं काही नाही व्हायचं.” तो म्हणाला.

“मग काय तर!” गाढव म्हणाला, “जर नेहमीचंच ओझं मला न्यावं लागणार असेल तर धनी कुठला का असेना! मला विचार करून काय करायचंय?”

## घुबडाचा सल्ला

घुबड हे सर्व पक्ष्यात फार शहाणे समजले जाते. फार पुरातन काळी जेव्हा ओक नावाच्या वृक्षाला पहिला अंकुर फुटला तेव्हा घुबडाने सर्व पक्ष्यांना एकत्र बोलाविले आणि ते म्हणाले, “हे समोर लहान झाड दिसते आहे ना, त्याचा तुम्ही आताच नाश करावा, असा माझा तुम्हाला सल्ला आहे. कारण ते पुढे मोठे झाले की, त्याच्यावर मिसलटो नावाची एक वेल उगवेल. त्या वेलीपासून एक प्रकारचा डिंक तयार होईल आणि त्याचा उपयोग करून माणसे पक्ष्यांना पकडण्याचे सापळे तयार करतील.”

नंतर जेव्हा पहिले अंबाडीचं बी पेरलं गेलं तेव्हाहि त्याने पक्ष्यांना सांगितले, हे पेरलेले बी तुम्ही खाऊन टाका. कारण हे उगवलं की माणसं त्याच्यापासून दोऱ्या बनवतील आणि तुम्हाला पकडण्याकरिता यांची जाळी विणतील.”

नंतर घुबडाला धनुष्यबाण घेऊन जाणारा पहिला पारधी दिसला. तेव्हाही त्याने पक्ष्यांना सांगितलं, “हा पारधी तुमचा घातकी शत्रू आहे हे नीट लक्षांत ठेवा. तुमचीच पिसं तो बाणाला लावील आणि बाण मारून तुम्हाला खाली पाडील.”

पण पक्ष्यांनी त्याच्या कुठल्याच बोलण्याकडे लक्ष दिले नाही. उलट, घुबडाला, वेड लागले आहे, अशी त्यांनी त्याची टिंगल केली; पण घुबडाने सांगितल्याप्रमाणे जेव्हा सर्व घडून आले तेव्हा मात्र पक्ष्यांचे मत बदललं आणि ते घुबडाच्या शहाणपणाकरिता त्याला मान देऊ लागले आणि म्हणूनच घुबडाला पाहिले की सर्व पक्षी हे आपल्या चांगल्याकरिता काही सांगेल म्हणून आदरपूर्वक त्याच्याभोवती जमा होतात. पण घुबड मात्र आता त्यांना काही सल्ला न देता उदासवाणे बसून असते आणि पक्ष्यांच्या मूर्खपणाबद्दल मनात विचार करीत असते.

## खोटी कळकळ

एका घोड्याचा मोतदार मोठा लोभी होता. तो रोज घोड्याला पुष्कळ वेळ खरारा करी आणि त्याचे अंग घासून घासून स्वच्छ करीत असे. पण घोड्याच्या चंदीमधले दाणे तो चोरून बाजारात विकीत असे. त्यामुळे घोड्याची शान दिवसेंदिवस बिघडतच चालली. शेवटी घोडा एक दिवस त्याला म्हणाला, “मी खरोखर छान आणि तुळतुळीत दिसावा असं तुला वाटत असेल तर माझा खरारा थोडा कमी कर आणि मला खायला पुरेसे दे!”

## उतावळा विचार

एकदा सर्व बैलांनी कसायाच्या विरुद्ध बंड करायचे ठरविले. ते आपल्या जातीचा एवढा

नाश करतात, तेव्हा एका ठरलेल्या दिवशी सर्व कसायांनाच मारण्याचा त्यांनी बेत आखला.

हे काम चांगल्या प्रकारे कसे करता येईल याबद्दल त्यांची सभा भरली होती. त्याच्यात जे भडक बैल होते त्यांनी तर शिंगे पाजळून अगदी अणकुचीदार करायला सुरवात केली. तेवढ्यात एक म्हातारा बैल समोर येऊन म्हणाला, "बंधूंनो, कसायाचा तुम्ही द्वेष करता आहात हे अगदी ठीकच आहे. त्यात काही प्रश्न नाही. पण हे कसाई निदान आपला धंदा सफाईदारपणे करतात आणि त्यामुळे आपल्याला कापताना ते कमीत कमी त्रास देतात. पण आपण जर त्यांना मारून टाकले तर नवशिके लोक या धंद्यात येतील आणि मग आपल्याला कापताना ते आपले असे काही हाल करतील की विचारू नका! कारण एक गोष्ट तुम्ही नीट लक्षात ठेवा. सर्व कसाई जरी मारले गेले तरी ही माणसं बैलाचं मांस खायचं कधीच सोडणार नाहीत."

## बेअकली गाढव

एक सामानाने लादलेले गाढव डोंगराच्या उतरणीवरून चालले होते. मागून त्याचा मालक त्याला हाकलीत होता. बराच वेळ ते रस्त्याने नीट चालले होते; पण एकाएकीच त्याने सरळ रस्ता सोडला आणि ते एका तुटलेल्या कड्याच्या दिशेने धावत सुटले.

ते पाहतांच त्याचा मालक त्याच्या मागे धावत गेला आणि वेळीच त्याने गाढवाचे शेपूट पकडले. तोपर्यंत गाढव कड्याच्या अगदी टोकापर्यंत पोचले होते. मालकाने शेपूट ओढून त्याला मागे खेचण्याचा प्रयत्न केला, पण गाढव जागचे जराही हलले नाही.

अखेर निराशेने त्याची शेपटी सोडून मालक म्हणाला, "ठीक आहे, तुझ्या मनाप्रमाणे होऊ दे. याच रस्त्याने तुला खाली जायचं असलं तर जा पण तो रस्ता म्हणजे भयंकर मृत्यूचा मार्ग आहे हे तुला लवकरच समजेल!"

●

# कर्जवसुली अधिकाऱ्यांना घरात कोंडून धमकावण्याचा जयश्री राजपुत या शूर महिला कार्यकर्तीचा पराक्रम

जळगाव जिल्हा चोपडे तालुक्यातील नागलवाडी या गवी कर्ज वसुलीसाठी गेलेल्या वसुली अधिकाऱ्यांना दोन पोलिस शिपायांसह एका खोलीत कोंडून ठेवण्याचा पराक्रम सौ. जयश्री राजपुत व संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दाखवला.

सदर घटनेची सविस्तर हकीगत अशी की, जळगांव जिल्हा बँकेचे कर्जवसुली अधिकारी हे दिनांक १५/२/९५ रोजी चोपडे तालुक्यातील नागलवाडी या गांवी वसुलीसाठी गेले असता त्यांनी गावात वसुलीसाठी जप्तीचा धुमाकूळ घातला. अशा परिस्थितीत गावातील संघटनेच्या एका कार्यकर्त्याने सौ. जयश्री राजपूत यांना सदरची घटना फोनवरून कळविली. त्याचक्षणी सौ. राजपुत ह्यानी त्यांच्या दीपक नावाच्या मुलास सोबत घेऊन मोटरसायकलवर नागलवाडी गाठली. गेल्या गेल्या त्यांनी वसुली अधिकारी ज्या घरात बसले होते त्या घरी गेल्या व गेल्याबरोबर आधी दरवाजा बंद करून दरवाजाला कडी घातली. अधिकारी एकदमच घाबरले कारण ते त्या बाईना आधीपासून ओळखत होते ते "दुर्गानंदिनी" म्हणून. अधिकाऱ्यांनी विचारले हे काय करता आहात? तेव्हा, मी तुमचीच जप्ती करायला आले म्हणून सौ. राजपुत यांनी सांगितले व तेथे जमलेल्या शेतकऱ्यांना तुम्ही आपआपल्या घरून एक महिला व तिच्या हातात एक झाडू घेऊन यायला सांगितले. तेव्हा त्या अधिकाऱ्यांबरोबर असलेला शिपाई (पोलिस) जास्तच घाबरला व त्याने सौ. राजपुत यांना विनवणी करून बाहेर जाण्याची परवानगी मिळविली व ग्रा. पं. ऑफिसमधून सरळ तालुका पोलिस स्टेशनला फोनद्वारे खबर कळविली. अवघ्या अर्ध्या तासात नागलवाडी या गावी २० ते २५ बंदुकधारी पोलिसांचा ताफा घेऊन पी.एस्.आय्. सावंत हे घटनास्थळी सिनेस्टाईल दाखल झाले.

गावात पोलिस आपल्याबरोबर त्या ठिकाणी २०० ते ३०० स्त्री-पुरुष जमा झाले. पी.एस्.आय्. सावंत व सौ. राजपुत यांच्यात खूप जोरदार शाब्दिक चकमक झाली. आतापर्यंत बंदुकीचा धाक चोरांना, गुंड-बदमाशांना न दाखवता ती आम्हाला दाखवून तुम्ही आजपावेतो खूप लूट केली, यापुढे आम्ही बंदुकीला घाबरणार नाही, वेळ आलीतर हातात बंदुका घेऊ असे सौ. राजपूत म्हणाल्या. शेवटी पी.एस्.आय्. सावंत यांनी माघार घेतली व ज्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून ४१० रु. वसुल केले होते ते सौ. राजपूत यांच्या सांगितल्यावरून शेतकऱ्यांना परत करविले व यापुढे अशी जप्ती आम्ही करणार नाही अशी कबुली दिल्यानंतरच सौ. राजपूत यांनी त्यांना सोडले.

घटनास्थळी शेतकरी संघटना विजयी असो, शरद जोशी झिंदाबादच्या घोषणा दणाणल्या व अशा विजयी वातावरणात गावकऱ्यांनी सौ. राजपूत यांचा सत्कार करून गौरव केला.

सदरच्या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झालेला आहे व कर्जवसुली अधिकाऱ्यांमध्ये घबराट निर्माण झाली आहे.

प्रेषक : श्री. भानुदास पाटील, चोपडा.

## हुतात्मा बाबू गेनूच्या थोरल्या भावजयींचे निधन

हुतात्मा बाबू गेनू यांच्या थोरल्या भावजयी श्रीमती कासाबाई कुशाबा सैद यांचे महाळुंगे-पडवळ या त्यांच्या राहात्या गावी मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात निधन झाले. त्या ८७ वर्षांच्या होत्या.

शेतकरी संघटनेच्या राजीवस्त्र बहिष्कार आंदोलनात मुंबईत शिवाजी पार्क येथे हुतात्मा बाबू गेनू स्मृतीदिनी – १२ डिसेंबर १९८५ रोजी झालेल्या शेतकरी-कामगार मेळाव्याच्या वेळी महाळुंगे-पडवळ या बाबू गेनूंच्या जन्मगावापासून आणलेल्या हुतात्मा ज्योतीबरोबर श्रीमती कासाबाई स्वतः आल्या होत्या. त्यावेळी शिवाजीपार्कवर झालेल्या 'राजीवस्त्रांच्या होळी'ला कासाबाईंनीच आपल्याबरोबर आणलेल्या हुतात्मा ज्योतीने दाह दिला होता.

# लेखाजोखा प्रमाणपत्रे – 'हा साप आणि ही काठी'

भारतांतील शेतकऱ्यांची आपण दरवर्षी किमान २४००० कोटी रुपयांनी लूट करतो असा देशाच्या केंद्रशासनाने 'गॅट' समोर कबुलीजबाब दिला.

एकूण आकड्यावरून आपल्या शिवारातले किती लुटले असावेत याबद्दल प्रत्येक शेतकऱ्याला माहिती होणे शक्य नाही. म्हणून शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांकडून 'लेखा जोखा'चे नमुने भरून त्यावरून गणकयंत्राच्या साहाय्याने, सरकारने विशिष्ट शेतकऱ्यांचे गेल्या दहा वर्षात किती रुपये लुटले त्याचा आकडा प्रमाणपत्राच्या रूपाने त्या शेतकऱ्याला दिला.

सरकारकडून येणे रकमेचे प्रमाणपत्र म्हणजे कर्जमाफी नव्हे तर सरकारच्या 'अनैतिक' धोरणांमुळे अंगावर पडलेल्या पण वास्तव्यात बसलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांना हाकलून देण्यासाठी वापरावयाची काठी आहे.

आता ही काठी वापरण्याची इच्छा, धमक बाळगणे – शक्य असेल तर व्यक्तिशः, अन्यथा संघटितरित्या – व ती अमलात आणणे हे आपला व्यवसाय स्वातंत्र्याचा अनुभव घेत चालू ठेवण्याची ईर्षा असलेल्या प्रत्येक शेतकऱ्याचे काम आहे.

आपल्यावर कोणाचे कर्ज नाही, उलट सरकारच आपले देणे लागते हे कळल्यावर कोणीतरी बाहेरून येऊन आपली कर्जवसुली थांबवील अशी अपेक्षा करणे म्हणजे आपल्या घरात शिरलेला साप आपल्याला दिसत असतांना दुसऱ्या कोणीतरी येऊन मारावा अशी अपेक्षा करण्यासारखे आहे.

गेल्या विधानसभा निवडणुकीत शेतकरी संघटनेने पूर्णपणे पाठिंबा दिलेल्या स्वतंत्र भारत पक्षाच्या जाहिरनाम्यात शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमुक्तीचे कलम होते. त्याचाही आधार शेतकऱ्यांच्या लुटीचा केंद्रशासनाने दिलेला कबुलीजबाबच होता. या जाहिरनाम्यावर निवडून आलेले आमदार कर्जमुक्तीसाठी आपल्या घरी धाष्ट्यांने लढाई करणाऱ्या शेतकऱ्यांची बाजू सरकार दरबारी निश्चित मांडतील.

हाती मिळालेली काठी घेऊन घरात घुसलेला साप मारायचा प्रयत्न करायचा का घरात साप घुसलेला आहे त्याच्या भीतीच्या छायेत जगायचे हे ज्याचे त्याने ठरवावे! तुम्ही प्रयत्न करत असाल तरच इतर मदतीला येतील ना? ●

# स्वतंत्र भारत पक्षाचे दोन आमदार महाराष्ट्र विधानसभेत

महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या फेब्रुवारी १९९५ मधील निवडणुकीत शेतकरी संघटनेने संपूर्णपणे पाठिंबा दिलेल्या स्वतंत्र भारत पक्षाच्या १९९ उमेदवारांपैकी दोन उमेदवार विजयी होऊन विधानसभेचे सदस्य झाले आहेत.

**१. ॲड. वामनराव चटप,**
**राजुरा, जि. चंद्रपूर.**

**२. श्री. दिलीप बोरसे,**
**बागलाण, जि. नाशिक.**

अपेक्षेपेक्षा अतिशय कमी यश मिळाले असले तरी स्वतंत्र भारत पक्षाच्या या दोनही आमदारांनी विधानसभेतील सत्तेच्या बाजारात सामील न होता पक्षाच्या ध्येयधोरणांशी प्रामाणिक राहून विधानसभेच्या पटलावरून शेतकरी व उद्योजकांच्या खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याकरिता लढाई सुरू ठेवण्याचा निर्धार केला आहे.

(पान ८ वरून)

काळजी करण्याचे आता कारण नाही, नागपूरला जाऊ नका असे सांगूनसुद्धा अनेक कार्यकर्ते तेथे जाऊन शरद जोशींना भेटून आले.

आता शरद जोशींची तब्येत सुधारत असून ते डॉक्टरांच्या परवानगीने दवाखान्याच्या आवारात थोडा वेळ हिंडू फिरू लागले आहेत. अजून आठवड्याभरात दवाखान्यातून घरी यायला त्यांना परवानगी मिळेल.

शेतकरी संघटनेच्या सर्वच कार्यकर्त्यांना आणि स्वतंत्र भारत पक्षाच्या निमित्ताने संबंधात आलेल्या इतरही कार्यकर्त्यांना शरद जोशींना स्वतः भेटून त्यांच्या तब्येतीची विचारपूस करण्याची तळमळ वाटणे साहजिकच आहे. सर्व कार्यकर्त्यांची ही इच्छा पूर्ण होण्याच्या दृष्टीने, शरद जोशी यांचा विश्रांतीचा काळ संपल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने लवकरच एक विस्तृत बैठक बोलावण्यात येईल. तोपर्यंत कार्यकर्त्यांनी आगामी लोकसभा निवडणुकांच्या दृष्टीने शेतकरी संघटनेची आपापल्या भागातील बांधणी, तसेच स्वतंत्र भारत पक्षाच्या बांधणीसाठी पक्षाच्या जिल्हा प्रमुखांना मदत करावी अशी शरद जोशींनी इच्छा व्यक्त केली आहे.

**– सुरेशचंद्र म्हात्रे**
आंबेठाण.

# शेतकरी संघटक पाक्षिकाच्या मालकीसंबंधी

**फॉर्म नं. ४ रुल नं ८ अन्वये निवेदन**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | अंगारमळा, मु. पो. आंबेठाण ता. खेड, जि. पुणे. |
| २. | प्रकाशन काळ | : | पाक्षिक |
| ३. | संपादक, मुद्रक प्रकाशक | : | नाव : सुरेशचंद्र पांडुरंग म्हात्रे<br>राष्ट्रीयत्व : भारतीय<br>पत्ता : अंगारमळा, मु. पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे. |
| ४. | वृत्तपत्राची मालकी व भांडवलात १% पेक्षा अधिक भागी असणारांची नावे व पत्ते | : | श्री. मोहन बिहारीलाल परदेशी मु. पो. चाकण ता. खेड, जि. पुणे. |
| ५. | रजि. क्रमांक | : | RN 39926/83 |

मी जाहिर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहे.

आंबेठाण,
२१ मार्च १९९५

**सुरेशचंद्र म्हात्रे**
प्रकाशक

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 24th March, 1995

**To**

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
March 21, 1995

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

### वेळीच वैद्यकीय उपचार झाले
# शरद जोशी यांची प्रकृती वेगाने सुधारते आहे

गेले चार महिने जे घडणार अशी मनात सतत भीती वाटत होती ते अखेर ११ मार्च १९९५ रोजी घडले.

तब्येत पूर्वीइतक्या जोमाने साथ देत नसतांनाही, भारतातील नागरिकांच्या खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यासाठी स्थापन केलेल्या स्वतंत्र भारत पक्षाची बांधणी व प्रचार आणि फेब्रुवारी १९९५ मध्ये झालेल्या निवडणुकीमधील स्वतंत्र भारत पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी श्री. शरद जोशी संपूर्ण महाराष्ट्रभर तीन वेळा फिरले. दौऱ्यामध्ये विश्रांतीसाठी खंड असा नव्हता. त्याही पलिकडे महाराष्ट्रातील प्रचारकार्य संपल्यासंपल्या गुजरातमध्ये स्वतंत्र भारत पक्षाचा झेंडा घेऊन निवडणूक लढविणाऱ्या सैनिक उमेदवारांच्या प्रचारासाठी तिकडेही दहा दिवस ते जाऊन आले.

महाराष्ट्राचा तिसरा दौरा व गुजरातचा दौरा शरद जोशींनी डॉ. शाम अष्टेकर यांना बरोबर घेऊनच केला.

प्रचार दौरे आटोपल्या आटोपल्या वर्ध्याला सेवाग्राम येथे २६, २७ फेब्रुवारी १९९५ रोजी स्वतंत्र भारत पक्षाच्या उमेदवारांचे पहिले शिबीर पार पडले. त्यात दोनही दिवस शरद जोशींनी मार्गदर्शन केले.

हे सर्व आटोपून मार्चच्या १ तारखेला आंबेठाणला परतलेल्या शरद जोशींचे ४/५ दिवस मागील काळातील पत्रव्यवहार हातावेगळा करण्यामध्येच गेले.

खुली अर्थव्यवस्था म्हणजे शेतकऱ्यांच्या आणि उत्पादक उद्योजकांच्या स्वातंत्र्याची खरीखुरी सुरुवात होय आणि त्याचा ध्यास घेतलेला असल्याने आपले त्यासंबंधीचे विचार मांडण्याची जी जी विधायक संधी पुढे येईल ती वापरायचीच ही शरद जोशींची रीत. त्यामुळे इतका थकविणारा कार्यक्रम पार पाडल्यानंतर सुद्धा ९/१० मार्चला एक परिसंवाद दिल्लीला, १३ मार्चला इंडियन मर्चंटस् चेंबर्स ने आयोजित केलेला आर्थर डंकेल यांचा कार्यक्रम मुंबईला आणि १५ मार्चला केंद्रीय अंदाजपत्रकावरील दूरदर्शन परिसंवादासाठी पुन्हा दिल्लीला असे कार्यक्रम विश्रांतीचा विचार बाजूला ठेवून शरद जोशींनी स्वीकारले होते.

त्यांतील पहिला दिल्लीचा कार्यक्रम आटोपून ११ मार्चला दिल्लीहून नागपूरकडे परतण्याच्या दिवशी सकाळी दिल्ली मुक्कामीच शरद जोशींना अस्वस्थपणा वाटू लागला. दिल्लीत डॉक्टरांनी तपासणी केली, ECG काढला. ECG त काही दोष दिसला नाही. म्हणून नेहमीच्याच स्वभावाप्रमाणे शरद जोशींनी अस्वस्थपणाकडे दुर्लक्ष करून दुपारच्या विमानाने नागपूर गाठले. नागपूरला श्री. पी. एस्. ठाकरे यांच्या घरी आल्या आल्या पुन्हा अस्वस्थपणाची जाणीव झाली म्हणून डॉक्टरांना पाचारण केले. दरम्यान, नागपूरहून शरद जोशींनी स्वतः आंबेठाणला फोन करून येथील परिस्थितीची चौकशी केली. बोलतांना आपल्याला थोडे बरे वाटत नसल्याचेही त्यांनी सांगितले.

श्री. ठाकरे यांचे घरी डॉ. अजिज खान यांनी त्यांच्या अस्वस्थपणावर उपचार सुरू केले, पण अस्वस्थपणा वाढू लागल्याने त्यांना रात्री साडेनऊच्या सुमारास डॉ. अजिज खान यांच्या दवाखान्यात हलविले. तेथील अत्याधुनिक उपकरणारांच्या साहाय्याने, हा अस्वस्थपणा अंजायनामुळे असल्याचे निदान झाले, त्यातून पुढे हृदयविकाराचा गंभीर झटका येण्याचा धोका असल्याने डॉक्टरांनी त्यांना त्वरीत अतिदक्षता विभागात ठेवून मॉनिटरच्या साहाय्याने त्यांच्या तब्येतीवर लक्ष ठेवायला सुरुवात केली व औषधोपचार चालू ठेवले. औषधोपचारांना यश येऊन सकाळपर्यंत डॉक्टरांनी त्यांना हृदयविकाराच्या झटक्याच्या धोक्यातून बाहेर काढले. दोन दिवसांनी तब्येतीत सुधारणा झाल्यानंतर अतिदक्षता विभागाची गरज संपली. पण पूर्ण सुधारणा होण्यासाठी दहा-पंधरा दिवस त्यांना दवाखान्यातच ठेवण्याचा निर्णय डॉक्टरांनी घेतला.

रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे या माध्यमांतून अपुऱ्या माहितीवर आणि कल्पनाविलासाने शरद जोशींच्या या आजारासंबंधी बातम्या दिल्या गेल्या. त्यासंबंधी डॉ. वसंतराव बोंडे यांनी वस्तुस्थितीची कल्पना देणारे पत्रक काढले, त्याला काही वर्तमानपत्रांचा अपवाद वगळता या प्रसिद्धीमाध्यमांनी प्रसिद्धी देण्याचे साधे सौजन्यही दाखविले नाही.

या बातम्यांमुळे महाराष्ट्रातूनच नव्हे तर भारतभरातून आंबेठाणच्या कार्यालयात शरद जोशींच्या तब्येतीची विचारपूस करणारे, त्यांच्या आजाराच्या गंभीरतेविषयी चौकशी करणारे, लगेच निघून नागपूरला त्यांना भेटायला जाण्याची इच्छा व्यक्त करणारे अगणित फोन आले.

(पान ७ पहा)

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी.-०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**